जिल्हा परिषद अमरावती
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
कॅम्प रोड, अमरावती ४४४ ६०१
दूरध्वनी क्रमांक - २६६२९२६ ई मेल - ceozp.amravati@maharashtra.gov.in वेबसाईट - www.zpamravati.gov.in

क्रमांक - जिप/मुकाअ/स्विस/९५८/१६ दिनांक - ५ नोव्हेंबर, २०१६

प्रति,

कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद अमरावती

विषय - राष्ट्रीय जि.प. पाटबंधारे कामगार संघटना, अमरावती यांचे कर्मचारी सदस्य विरुध्द जि.प. अमरावती यांचे मा. औदयोगिक न्यायालय, अमरावती येथे दाखल प्रकरण क्रमांक ULP No.89/06 चे अनुषंगाने करावयाची कार्यवाहीबाबत..

विषयांकित प्रकरणाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय जि.प. पाटबंधारे कामगार संघटना, अमरावती यांचे सदस्य कर्मचारी १. श्री. अशोक वाघमारे २. श्री. ए.डब्ल्यु. गजभीये ३. सुरेंद्र मालवे ४.श्री. सुधीर माहोरे यांनी मा. औदयोगिक न्यायालय, अमरावती येथे प्रकरण क्रमांक ULP 89/06 अन्वये सदर कर्मचा-यांना रुपांतरीत नियमित आस्थापनेवर (CRTE) घेणेसाठी प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरणी मा. औदयोगिक न्यायालयाने दिनांक २४.४.२०१५ रोजी आदेश पारीत करुन अर्जदार कर्मचा-यांना कालेलकर करारानुसार त्यांचे सेवेची पाच वर्ष पूर्ण झाल्याचे तारखेपासून रुपांतरीत नियमित आस्थापनेवर (CRTE) घेणे आणि सदर कर्मचा-यांना CRTE नुसार फायदे देवून वेतनाची थकबाकी देणेबाबत आदेश पारीत केलेले आहेत. सदरील कार्यवाही निकालाचे तारखेपासून ३ महिन्याचे आत करावी लागणार आहे.

२. मा. औदयोगिक न्यायालयाचे आदेशा विरुध्द जिल्हा परिषदेने मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ५५८३/२०१५ अन्वये अपिल दाखल केलेले होते. मा. उच्च न्यायालयाने ८ ऑगस्ट २०१६ रोजी सदर प्रकरणी आदेश दिलेले असून जिल्हा परिषदेची रिट याचिका खारीज केलेली आहे. त्यामुळे आता मा. औदयोगिक न्यायालयाचे पारिक केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास सदर कर्मचा-यांना CRTE वर घेण्याच्या प्रस्तावास शासनाची परवानगी गरजेचे आहे. सदर कर्मचा-यांना CRTE वर घेणेसाठी यापूर्वी जिल्हा परिषदेकडून मा. सचिव ग्रामविकास यांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु, दिनांक २४ एप्रिल २००१ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सविस्तर सदर कर्मचा-यांची सेवा विषयक माहिती उपलब्ध करुन न दिल्याने प्रस्तावास अदयापपर्यत मान्यता प्राप्त झालेली दिसत नाही. आता विहित कालावधीत मा. औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन न झाल्यास प्रतिवादी म्हणून मा. सचिव ग्रामविकास आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आणि यांचे विरुध्द अवमान याचिका दाखल होण्याची शक्यता आहे.

३. मा. न्यायालयाचे आदेशाचे अवलोकन करताना असे निदर्शनास येत आहे की, अर्जदार कर्मचारी रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुर म्हणून होते. रोजगार हमी योजनेवरील मजुरांना कालेलकर करारानुसार CRTE नुसार फायदा किंवा नियमित सेवेत घेता येत नाही, ही बाब मा.

न्यायालयाने अधोरेखीत केलेली असतांना सुध्दा बांधकाम विभागाकडून सदर कर्मचारी रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुर म्हणूनच होते त्या समथर्नाथ दस्ताऐवज उपलब्ध करुन देता आलेली नाहीत किंवा तशा प्रकारचा पुरावा/साक्ष बांधकाम विभागातील अधिकारी यांनी मा. न्यायालयात दिलेला नसल्याने जिल्हा परिषदेच्या विरुध्द निकाल लागल्याचे प्रथमदर्शनी दिसते. यासाठी बांधकाम विभाग प्रथमत: जबाबदार असल्याचे माझे मत आहे.

४. प्रस्तूत प्रकरणी, अवमानना याचिका होवू नये साठी आपण स्वत: अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे पुनर्विचार याचिका किंवा मा. औद्योगिक न्यायालयाचे विरुध्द सक्षम न्यायाधिकरनाकडे स्थगनादेश मिळविणेसाठी तातडीने कार्यवाही करावी आणि या प्रकरणी अवमान याचिका होणार याची दक्षता आपण घ्यावी. प्रस्तूत न्यायालीन प्रकरणात प्रतिज्ञापत्र व इतर अनुषंगीक न्यायालयीन दस्ताऐवज दाखल करण्यास आपणास प्राधीकृत करण्यात येत आहे. सदर प्रकरणी विलंब झाल्यास अथवा न्यायालयाचे आदेशाचा अवमान झाल्यास याकरिता सर्वस्वी जबाबदार आपण आहात ही बाब मा. न्यायालयाचे निदर्शनास आणण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५. तसेच सदर नस्तीची पडताळणी केली असता असे निदर्शनास येते की, मा. औद्योगिक न्यायालय, अमरावती येथील प्रकरण क्रमांक ULP No.89/06 मध्ये दाखल केलेल्या दस्ताऐवजाची प्रथमदर्शनी पडताळणी केली असता शंकास्पद बाबी आढळल्या आहेत, बांधकाम विभागाची संबंधित नस्ती सहपत्रित आहे. सदरील दस्ताऐवज हे बनावट आणि संगनमताने तयार केली असल्याची शक्यता असून त्याआधारे संबंधितांनी शासकीय लाभ घेण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसते. सदर प्रकरण गंभीर स्वरुपाचे असल्याने बनावट दस्ताऐवजाच्या आधारे जि.प. मार्फत संबंधितांना कायम नोकरी दिली गेल्यास जिल्हा परिषद तसेच महाराष्ट्र शासनास आर्थीक भुर्दंड पडेल तसेच अशा इतरही प्रकरणांमध्ये सदर प्रकरणांचा उल्लेख करुन लाभ घेण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता आहे. सदर शक्यता पडताळून शंकास्पद बाबी तपासणे आवश्यक आहे. याकरिता संबंधित उप विभागाचे कार्यालय प्रमुख या नात्याने श्री. ठाकूर यांना पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती येथे फौजदारी गुन्हां दाखल करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. याबाबत श्री. ठाकूर यांना याबाबत आपण आवश्यक ते मार्गदर्शन करुन सुव्यवस्थित तपास होण्याबाबत खबरदारी घ्यावी.

KSK

(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

प्रत माहितीस्तव सादर.
मा. विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांना माहितीस्तव सादर.

प्रतिलिपी -

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
२. विधी शाखा, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अमरावती.
३. ॲड पराग अ. कडू, रा. संजीवनी कॉलनी, कॉंग्रेस नगर, अमरावती.